श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

नोव्हेंबर २०२३ | वर्ष – ११ अंक – ११ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने १२

## विद्यार्थ्यांना सशस्त्र दलातील करिअर घडवण्याची प्रेरणा!



*इंग्रजी माध्यम शाळेतील विद्यार्थ्यांची पुणे येथील हवाई दल तळाला भेट*



श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्रजी माध्यम शाळेत सर्वांगीण शिक्षणाला महत्व दिले जाते. आजचे तरुण विद्यार्थी उद्याचे जबाबदार नागरिक आहेत ज्यांच्या हातात देशाचे भवितव्य आहे. विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना जागृत ठेवावी आणि त्यांनी आपल्या शूर सैनिकांनी मातृभूमीच्या रक्षणासाठी केलेल्या सर्वोच्च बलिदानाची जाणीव ठेवावी यासाठी संरक्षण दलातील अधिकारी आणि शास्त्रज्ञ यांच्याशी विद्यार्थ्यांचा थेट संवाद घडवून सशस्त्र दलात सामील होण्यासाठी आमची शाळा विद्यार्थ्यांना प्रेरित करते.

याच संदर्भात, माजी एअर चीफ मार्शल प्रदीपजी नाईक यांच्या नेतृत्वाखाली आयोजित लोहगाव – पुणे येथील हवाई दलाची भेट एस व्ही जे सी टी शाळेच्या इयत्ता ९ वी आणि १० वीच्या ८३ विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी एक अविस्मरणीय आणि प्रेरणादायी अनुभव होता.

कडक बंदोबस्तात सुरक्षिततेच्या नियमांनुसार खबरदारी घेऊन विद्यार्थी आणि शिक्षकांना हवाई युद्ध यंत्रांची सफर घडविण्यात आली. मॅनपॅड्स मिसाईल, आकाश मिसाईल, रडार, मशीनगन्स, इ. कार्यरत युद्ध उपकरणे विद्यार्थ्यांना जवळून पाहता आली तसेच काही शस्त्रे हाताळताही आली. लढाऊ विमान सुखोई ३०च्या प्रशिक्षित वैमानिकाने सुखोई ३०ची ठळक



*माजी एअर चीफ मार्शल प्रदीपजी नाईक आणि एअर ऑफिसर कमांडिंग शेखरजी यादव यांच्यासमवेत विद्यार्थी आणि शिक्षक*

वैशिष्ट्ये प्रत्यक्ष विमानाभोवती विद्यार्थ्यांना नेऊन समजावून सांगितली. जगातील सर्वात चपळ लढाऊ विमान सुखोई-३०च्या अत्यंत अनुभवी वैमानिकांनी एरोबॅटिक प्रात्यक्षिक करताना लूप, स्पिन, टंबल, स्टॉल, रोल, टच द स्काय, स्टॅन्ड स्टील यासारखे थरारक प्रदर्शन करून निखळ कौशल्य प्रकट केले आणि विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. फ्लाइट-सिम्युलेशन स्टेशनमध्ये सुखोई-३० फ्लाइट-सिम्युलेशनने सर्वांना आभासी उड्डाणावर नेले. तसेच विशेष प्रशिक्षित सैन्यदल 'गरुड'ने आकाशातील हेलिकॉप्टर मधून दोरीच्या साहाय्याने एकामागोमाग एक जमिनीवर उतरून शिस्तबद्ध चाल करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. हे अनुभव केवळ उत्साहवर्धकच नव्हते तर रोमांचकही होते.

विद्यार्थ्यांनी लढाऊ वैमानिक आणि अधिकाऱ्यांशी संवाद साधला आणि युद्ध यंत्रे आणि त्यांच्या प्रशिक्षणाशी संबंधित प्रश्न विचारले. स्वतः माजी एअर चीफ मार्शल प्रदीपजी नाईक आणि एअर ऑफिसर कमांडिंग शेखरजी यादव यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून विद्यार्थ्यांना प्रोतहित केले. विशेष छायाचित्रकाराकडून विद्यार्थ्यांचे सर्व उपक्रमांचे फोटो काढण्यात आले व हवाई दलाचे चिन्ह असलेला मोठा मग प्रत्येक विद्यार्थ्याला आठवण म्हणून देण्यात आला. या हृदयस्पर्शी आदरातिथ्याबद्दल सर्वांनी कृतज्ञता व्यक्त केली.

हवाई दलाच्या भेटीमुळे आपल्या राष्ट्रासाठी जोखीम पत्करण्यास तयार असलेल्या शूर योद्ध्यांकडून देशभक्ती, शिस्त, वक्तशीरपणा, समर्पण आणि जिद्द शिकायला मिळाली. विद्यार्थ्यांना सशस्त्र दलातील संभाव्य करिअरचा विचार करण्यास प्रवृत्त केले.







*मॅनपॅड्स मिसाईल, आकाश मिसाईल, रडार, मशीनगन्स, इ. कार्यरत युद्ध उपकरणे विद्यार्थ्यांना जवळून पाहता आली*

*''एअर फोर्स स्टेशन, पुणे, येथे दिलेली भेट एक अविस्मरणीय अनुभव होता. हाताची दुर्बीण आणि डोळ्यांचे मॅग्निफायिंग ग्लास करून सुखोई ३०चे थरारक एरोबॅटिक्स पाह–ताना, वैमानिकांचा अभिमान वाटला. सुखोई ३०च्या सिम्युलेशनद्वारे जमिनीवर राहूनसुद्धा आकाशात उडण्याचा अतिशय रोमांचकारी अनुभव मिळाला. एअर फोर्स स्टेशनमधील सर्व अधिकाऱ्यांची शिस्त, त्यांच्या चेहऱ्यावरील तेज आणि बोलण्यातील आत्मविश्वास पाहून मी प्रोत्साहित झाले. या सर्व गोष्टी आपण आपल्या दैनंदिन जीवनात आणणे महत्वाचे आहे, हे मला जाणवले. आपल्यासाठी महत्वपूर्ण असलेले विषय जसे की आपापसातील वाद, सोशल मीडियावरील ट्रेंड्स आणि आरामदायी जीवन हे त्या सर्वांच्या ध्येयापुढे खूपच क्षुल्लक आहे. आयुष्यात शिस्तबद्धता, वेळेचा उपयोग व ध्येयवेडेपणा किती महत्त्वाचा आहे, हे या भेटीदरम्यान मला समजले. तसेच आपल्या जीवनात असे ध्येय ठेवावे की जे समाज आणि देशाच्या सदैव उपयोगी येईल असे मी ठरविले आहे.'' -- कु. अनुष्का सकपाळ, इ. ९ वी*

*एका विद्यार्थिनीचे मनोगत*



*विद्यार्थ्यांना काही शस्त्रे हाताळताही आली*

# कॅडिला फार्मास्युटिकल्सचे कार्यकारी संचालक डॉ. बकुलेश खमर यांची भेट



*डावीकडून : पॅथॉलॉजी विभागातील वैद्यकीय विद्यार्थी , डॉ. श्रीपाद बाणावली (डायरेक्टर ऑफ अकॅडेमिक्स, टाटा मेमोरिअल सेंटर मुंबई), डॉ. बकुलेश खमर, डॉ. विजय डोम्बले, डॉ. प्रकाश जाधव, डॉ. लोकेश पाटील*

कॅडिला फार्मास्युटिकल्सचे कार्यकारी संचालक डॉ. बकुलेश खमर यांनी दि. २० ऑक्टोबर २०२३ रोजी ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाला भेट दिली. वालावलकर रुग्णालयात सुरू असलेल्या संशोधनाची त्यांनी आवर्जून माहिती घेऊन संपूर्ण प्रकल्पाला भेट दिली. डॉ. श्रीपाद बाणावलींचे आणि सर्व सहकाऱ्यांनी उभारलेल्या कॅन्सर युनिटचे कौतुक करत पॅथॉलॉजी पदवी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना कॅन्सरमधील 'इम्युनो हिस्टो-केमिस्ट्री' ह्या विषयावर एक व्याख्यानही सादर केले



*डॉ. बकुलेश खमर वैद्यकीय विद्यार्थ्यांना व्याख्यान देताना*



*डावीकडून डॉ. श्रीपाद बाणावली (डायरेक्टर ऑफ अकॅडेमिक्स, टाटा मेमोरिअल सेंटर, मुंबई), डॉ. बकुलेश खमर, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. लोकेश पाटील*

# डॉ. श्रीपाद बाणावली यांना जीवन गौरव पुरस्कार




*इंडियन सोसायटी ऑफ पेडिऍट्रिक अँड मेडिकल ऑन्कॉलॉजीच्या पदाधिकाऱ्यांकडून पुरस्कार स्वीकारताना डॉ. बाणावली (डावीकडून तिसरे)*

डॉ. श्रीपाद बाणावली (डायरेक्टर ऑफ अकॅडेमिक्स, टाटा मेमोरिअल सेंटर, मुंबई) यांचा इंडियन सोसायटी ऑफ पेडिऍट्रिक अँड मेडिकल ऑन्कॉलॉजी ह्या नामवंत संस्थेतर्फे 'जीवन गौरव पुरस्कार' देऊन सत्कार करण्यात आला. डॉक्टर बाणावलींनी 'पेडिऍट्रिक कॅन्सर' या विषयात केलेल्या भरीव कामगिरीबद्दल त्यांचे कौतुक तर आहेच पण डेरवणसारख्या दुर्गम खेड्यात गरीब रुग्णांसाठी एक अद्ययावत कर्करोग उपचार केंद्र निर्माण करण्यातही त्यांच मोलाचा सहभाग आहे आणि ह्याच सामाजिक बांधिलकीमुळे अनेक वंचित रुग्णांना कर्करोग उपचार सुविधा विनासायास प्राप्त होत आहे.

## वालावलकर रुग्णालयाच्या आवारात 'एच.डी.एफ.सी.' स्मार्ट बँकिंगचे उदघाटन




एच.डी.एफ.सी बँकेतर्फे वालावलकर रुग्णालयाच्या आवारात 'स्मार्ट बँकिंग लॉबी (SBL)' ग्राहकांच्या सुविधेसाठी सुरू करण्यात आली आहे. त्याचा लाभ आता रुग्णालय परिसरातील डॉक्टर्स, सर्व कर्मचारी तसेच सर्व रुग्ण आणि विद्यार्थ्यांना होणार आहे.

## पिडियाट्रिक ॲडव्हान्स्ड लाइफ सपोर्ट कार्यशाळा संपन्न



*बसलेले (डावीकडून) : डॉ. अजिंक्य काळे, भूलतज्ज्ञ डॉ. अस्मिता कर्नाळकर, डॉ. लीना ठाकूर आणि मागे उभे : प्रशिक्षणार्थी विद्यार्थी*



*डॉ. अजिंक्य काळे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना*

डॉ. अजिंक्य काळे (PALS प्रशिक्षक - इंग्लंड येथून प्रशिक्षण) व भूलतज्ज्ञ डॉ. अस्मिता कर्नाळकर व डॉ. लीना ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय पदव्युत्तर पदवी (एमडी/एमएस) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना PALS कार्यशाळा दि. ३१ ऑक्टोबर २३ रोजी आयोजित करण्यात आली. या उपक्रमात नवजात बालकांचे प्राण वाचवण्याचे प्रशिक्षण दिल्यामुळे नवजात विभागातील उपचारांचा स्तर उंचावण्यात हातभार लागणार आहे.

## ॲडव्हान्स्ड कार्डियाक लाइफ सपोर्ट – बेसिक लाइफ सपोर्ट कार्यशाळा संपन्न



*प्रशिक्षणार्थी विद्यार्थी प्रात्याक्षिक करताना*

भ. क. ल. वालावलकर रुग्णालयात प्रशिक्षणार्थी डॉक्टरांसाठी दोन दिवसाची कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत पेशन्टचे हृदय बंद पडल्यास तातडीने अद्ययावत विविध उपचार कशा प्रकारे करण्यात यावेत याचे प्रशिक्षण डॉ. मंदार अक्कलकोटकर (अमेरिकन हार्ट असोसिएशन, इन्स्पेक्टर) पुणे व डॉ. अस्मिता कर्नाळकर वालावलकर रुग्णालयाच्या भूलतज्ज्ञ यांनी दिले.

प्रशिक्षणाआधी आणि नंतर परीक्षा घेण्यात आली. विविध प्रात्यक्षिके करून घेण्यात आली, तसेच कार्यशाळेच्या अखेरीला प्रशिक्षणार्थींचे मूल्यमापन करून प्रमाणपत्रे देण्यात आली.

# भोंडला

भोंडला हा सण मुलींचा विशेष आवडता आहे. १७ आणि २० ऑक्टोबर २०२३ या दिवशी भोंडला साजरा करण्यात आला. ११८ मुलींनी भाग घेऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिलात ह्या सणानिमित्त तरुण मुलींशी डॉक्टर्सना संवाद साधता आला आणि त्यांचे आरोग्य सुदृढ असणे किती महत्त्वाचे आहे ते पुन्हा अधोरेखित झाले



*भोंडला खेळताना मुली*

# ब्रेस्ट कॅन्सर स्क्रिनिंग– 'रक्षिता व्हॅन'



*लायन्स क्लब सावर्डे येथे ब्रेस्ट कॅन्सर स्क्रिनिंग शुभारंभ*



*अंतर– निवासी डॉक्टर कर्करोगबदल प्रबोधन करताना*

नवरात्री उत्सवाच्या निमित्ताने स्त्रियांकरिता दरवर्षी कॅन्सर स्क्रीनिंग कार्यक्रमाचे आयोजन होते. या वर्षी मात्र एका विशेष तंत्रज्ञानाने स्त्रियांचे स्क्रिनिंग केले गेले. मुंबईतील नाना पालकर ह्या सेवाभावी संस्थेतर्फे एक 'रक्षिता'नामक मोबाइल व्हॅन गावागावात आणि रुग्णालयात उपलब्ध केली गेली. ह्या तंत्रज्ञानामुळे वेदनारहित, स्पर्शरहित आणि रेडिएशनरहित स्तनांची तपासणी केली गेली.

एरवी स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या माता भगिनींनी 'रक्षिता गाडी' स्त्रियांच्या दारात मोफत उपलब्ध झाल्यामुळे उत्स्फुर्त प्रतिसाद दिला जेणेकरून जास्तीत जास्त महिलांपर्यंत पोचणे शक्य झाले. या 'मोबाइल मॅमोग्राफी व्हॅन' ज्या ठिकाणी स्तनाचा कर्करोग तपासणी दर कमी आहे अशा ठिकाणी पोहोचण्यास सक्षम आहेत. ह्या मोबाइल व्हॅनमध्ये उत्तम प्रकारे प्रशिक्षित महिला तंत्रज्ञ कुमारी तेजस्विनी रोकडे यांनी चोख कामगिरी बजावली. त्याचबरोबर अंतर–निवासी डॉक्टर्सनी महिलांचे 'कर्करोगाची पूर्व लक्षणे' यावर प्रबोधन केले.

ही रक्षिता व्हॅन वालावलकर हॉस्पिटलमध्ये दि. २५ ऑक्टोबर ते ३० ऑक्टोबर रोजी खास स्त्रियांसाठी नाना पालकर प्रतिष्ठानतर्फे उपलब्ध केली गेली. ह्या उपक्रमामार्फत रोज अंदाजे ४० स्त्रियांचे स्तनाच्या कॅन्सरचे स्क्रीनिंग केले गेले. ह्याकरता चिपळूण तालुक्यातील 'आशा सेविकांना' प्राधान्य देण्यात आले होते.

# डोहाळे जेवण

गर्भार अवस्थेत मातेच्या आहाराकडे लक्ष देणे, जेणेकरून आई आणि बाळ ह्या दोघांचेही आरोग्य उत्तम राहावे ह्याकरता आपल्या संस्कृतीत डोहाळेजेवण साजरे करून मातेच्या आवडीचे पदार्थ तिला खाऊ घातले जातात आणि तिचे लाड करून तिचे मानसिक आरोग्यही उत्तम राहील असे वर्तन केले जाते. अगदी त्याच धर्तीवर खेड्यापाड्यातील गोरगरीब महिला ज्या कदाचित ह्या सणापासून वंचित असतील त्यांना रुग्णालयात आमंत्रित करून त्यांचे डोहाळे पुरवले जातात. १३ आणि २१ ऑक्टोबरला डोहाळे जेवणचा कार्यक्रम साजरा करण्यात आला, त्यामध्ये ३१ गरोदर मातांनी भाग घेऊन उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. या वेळी डोहाळे पुरवण्याबरोबर तिला आधुनिक औषधोपचारदेखील पुरविले जातात.



*अर्बन हेल्थ सेन्टरला डोहाळजेवणाचा कार्यक्रम*



*वालावलकर हॉस्पिटल मध्ये सामुदायिक डोहाळ जेवणाचा कार्येक्रम*

## सामुदायिक वाढदिवसातून कुपोषण निर्मूलन

वालावलकर रुग्णालयातर्फे गेली तीन दशके नवजात बालकांचे सामुदायिक वाढदिवस दर महिन्याला साजरे केले जातात. मुलांना औक्षण केल्यावर पौष्टिक खाऊ वाटला जातो. ऑक्टोबर महिन्यात वैद्यकीय महाविद्यालाच्या शहरी (चिपळूण) आणि ग्रामीण (डेरवण) केंद्रामध्ये असे वाढदिवस उत्साहाने साजरे करण्यात आले. त्यात ऑक्टोबर महिन्यात जन्मलेल्या अनेक बालकांनी आणि पालकांनी आनंदाने सहभाग घेतला. वाढदिवस साग्रसंगीत साजरे झाल्यावर पालकांना मुलांच्या पोषणाबाबत मार्गदर्शन आणि मुलांची तपासणी करण्यात आली. वैद्यकीय विद्यार्थ्यांनी पालकांना आणि विशेषतः मातांना केलेलं प्रबोधन प्रभावशाली ठरत आहे.



*सामुदायिक वाढदिवस*

## बारसे

नवजात बालिकांकडे लक्ष केंद्रित व्हावे आणि परिवाराने तिला आनंदाने स्वीकारावे ह्याकरिता ग्रामीण भागातील मुलींबाबत सामाजिक प्रतिकूल परिस्थिती जाणून घेऊन ह्या उपक्रमाची सुरूवात करण्यात आली. दर महिन्याप्रमाणे २२ ऑक्टोबर या दिवशी १८ बालिकांचा नामकरण विधी करण्यात आला. या वेळी अंतरनिवासी डॉक्टरांनी नवजात शिशूंची काळजी कशी घ्यावी ह्याबद्दलचे प्रबोधनही केले.



*नवजात बालके आणि माता*




*वालावलकर हॉस्पिटलमध्ये सामुदायिक बारसे कार्यक्रम*

## घरोघरी जाऊन जोखमीच्या गरोदर मातांचा शोध

ह्या उपक्रमामध्ये गरोदर मातांची आरोग्यतपासणी, वजन-उंचीमापन, औषधोपचार व आरोग्याबद्दल जनजागृती केली जाते. घरोघरी, अंगणवाडी तसेच आरोग्य केंद्रात भेटी देऊन गरोदर मातांना पौष्टिक लाडू वाटप केले जाते, आरोग्यबद्दल मार्गदर्शन केले जाते. शिवाय उपक्रम अंतर्गत बाळंतपण पूर्णतः विनामूल्य केले जाते. ऑक्टोबर महिन्यात वहाळ, रामपूर, तोंडली, पिंपळी बुरमई, अडरे, अगावे, मांडकी, दादर इत्यादी आरोग्य केंद्रात भेटी दिल्या गेल्या.



*गरोदर मातांची रक्तदाब तपासणी*



*गरोदर मातांचे वजन करताना*

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

# डेरवण क्रीडासंकुलात शालेय तालुका खो खो स्पर्धा संपन्न

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट क्रीडासंकुलात दि. ६ सप्टेंबर ते ९ सप्टेंबर २०२३ या कालावधीत शालेय तालुका खो खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये १४ वर्षांखालील मुलांमध्ये १४ संघ आणि मुलींमध्ये ९ संघ, १७ वर्षांखालील मुलांमध्ये २९ संघ आणि १७ वर्षांखालील मुलींमध्ये एकूण ८ संघ तसेच १९ वर्षांखालील मुलांमध्ये १९ संघ आणि १९ वर्षांखालील मुलींमध्ये एकूण ३ संघ अशा एकूण ८२ संघांनी सहभाग नोंदविला होता. स्पर्धेतील सहभागी खेळाडूंची विक्रमी संख्या यावर्षी तब्बल ९८४ झाली.

स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी चिपळूण तालुका शारीरिक शिक्षण संघटनेचे अध्यक्ष श्री. राकेश खांडेकर, चिपळूण तालुका स्पर्धा समन्वयक श्री. समीर कालेकर, क्रीडा शिक्षक सर्वश्री उल्हास मोहिते, मोहसीन पटेल, रोहित गमरे, शिवाजी सरगर, हेरंब शिर्के, पडवळे, रामचंद्र चव्हाण पाटील, दत्तू बागुल, कडगावे, जीवन पाटील, विनय गोठणकर, बबन आघाव, मुंकुद पोटभरे, दादा पांढरे, राजश्री टकले आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलांमध्ये जनता माध्यमिक विद्यालय, कोकरे संघाने अंतिम सामन्यात म. शिर्के माध्यमिक विद्यालय भोमचा पराभव करून विजेतेपद पटकावले. तसेच न्यू इंग्लिश स्कूल खेर्डी, सती संघाने तृतीय क्रमांक पटकाविला.

१४ वर्षांखालील मुलींमध्ये जनता माध्यमिक विद्यालय, कोकरे संघाने अंतिम सामन्यात न्यू इंग्लिश स्कूल विद्यालय, वहाळ संघाचा पराभव करून विजेतेपद पटकावले. तसेच मेरी माता स्कूल, चिपळूण संघाने तृतीय क्रमांक पटकाविला.

१७ वर्षांखालील मुलांमध्ये न्यू इंग्लिश स्कूल विद्यालय, वहाळ आणि दलवाई हायस्कूल मिरजोळे, चिपळूण यांच्यात झालेल्या अटीतटीच्या अंतिम सामन्यात न्यू इंग्लिश स्कूल, वहाळ या संघाने प्रथम क्रमांक पटकावला. तर शि.आ.बा. सुर्वे माध्यमिक विद्यालय, निवळी संघाने तृतीय क्रमांक पटकाविला.

१७ वर्षांखालील मुलींमध्ये न्यू इंग्लिश स्कूल खांडोत्री, आबीटगाव आणि गोविंदराव निकम माध्यमिक विद्यालय सावर्डे, चिपळूण यांच्यात झालेल्या अटीतटीच्या अंतिम सामन्यात न्यू इंग्लिश स्कूल खांडोत्री, आबीटगाव संघ विजयी ठरला. तर म. शिर्के माध्यमिक विद्यालय भोम संघ तृतीय क्रमांकाचा मानकरी ठरला.

१९ वर्षांखालील मुलांमध्ये व.ज. भागवत विद्यालय ज्यु. कॉलेज बोरगाव संघ विजेतेपदाचा मानकरी ठरला तर व.ज. भागवत माध्यमिक विद्यालय ज्यु. कॉलेज मार्गताम्हाने संघाने तृतीय क्रमांक पटकाविला. तसेच गोविंदराव निकम माध्यमिक विद्यालय सावर्डे, चिपळूण संघाने तृतीय क्रमांक पटकाविला.

१९ वर्षांखालील मुलींच्या अंतिम सामन्यात व.ज भागवत विद्यालय ज्यु. कॉलेज बोरगाव संघाने गोविंदराव निकम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सावर्डे, चिपळूण संघावर रोमहर्षक विजय मिळवून विजेतेपद पटकाविले. तसेच डॉ. तानाजी चोरगे ज्यु. कॉलेज मांडकी, पालवण संघाने तृतीय क्रमांक पटकाविला.



*चिपळूण तालुका शालेय खो खो स्पर्धेतील एक दृश्य*

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६३९ येथून प्रकाशित केले.
Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील - ९९२१२ ५१६९५,
उपसंपादक : सौ. शरयू यशवंतराव - ९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर - ९५८८४ ७९२२०